ज्या ग्रामपंचायतीच्या विभाजन झाल्यामुळे मूळ ग्रामपंचायतचे विसर्जन होऊन/ एकत्रीकरणामुळे नव्याने स्थापित ग्रामपंचातींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी **प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रम.**

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/ग्रापंनि २०१९/प्र.क्र.११/का.८
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०९/१०/२०१९

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील तरतुदीनुसार :-

i) ग्रामपंचायतींच्या मुदत संपण्यापूर्वी निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे;

ii) ज्याअर्थी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १५९ व १६० मधील तरतुदीन्वये, ज्या ग्रामपंचायतीचे विभाजन झाल्यामुळे मूळ ग्रामपंचायतचे विसर्जन होऊन तसेच एकत्रीकरणामुळे नव्याने स्थापितग्रामपंचायतींची रचना करण्यासाठी सहा महिन्यांच्या आत निवडणूक प्रक्रिया पार पाडणे आवश्यक आहे, अशा नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रम राबविणे क्रमप्राप्त आहे. माहे जुलै २०१९ ते माहे सप्टेंबर २०१९ या कालावधील विर्सजित झालेल्या १३ व एकत्रीकरण झालेली १ अशा १४ ग्रामपंचायतींच्या अधिसूचना राज्य निवडणूक आयोगाकडे प्राप्त झाल्या आहेत.

iii) आणि ज्याअर्थी, ग्रामपंचायतींच्या निवडणुकांच्या मुख्य तीन टप्यांना (प्रभाग रचना व आरक्षण, प्रभागनिहाय मतदार यादीचे विभाजन व प्रत्यक्ष निवडणूक) लागणारा कालावधी लक्षात घेता प्रभाग रचना व आरक्षणाच्या कार्यवाहीस तात्काळ सुरूवात करावी लागणार आहे.

२. त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १० अ (४) नुसार मिळालेल्या व इतर अधिकारांचा वापर करुन सोबतच्या विवरणपत्रातील ग्रामपंचायतींच्या निवडणुकांकरीता प्रभाग रचना करणे व आरक्षण ठरविणे याकरीता पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

## आदेश

३. ग्रामपंचायतींच्या सर्व निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची असल्याने, त्यांनी राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाप्रमाणे लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे सर्व काळजी व दक्षता घेऊन निवडणुका योग्यप्रकारे पार पाडाव्यात.

४. प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रमाचे मुख्य टप्पे खालीलप्रमाणे राहतील-:

**४.१ प्रभाग रचना तयार करणे-:**

(अ) गुगल मॅपवर MRSAC यांनी तयार केलेले नकाशे Super Impose करून गावाचे नकाशे अंतिम करणे. (कार्यवाही - तहसिलदार)

(ब) नकाशावर प्रचलित पध्दतीने प्रभाग पाडणे ( ग्रामपंचायतींच्या दक्षिण दिशेपासून सुरुवात करुन विहित रितीने ) व अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती यांचे आरक्षण निश्चित करणे :
( कार्यवाही - तलाठी व ग्रामसेवक )

(क) प्रारूप प्रभाग रचनेला मान्यता देणे - ( समिती : तहसिलदार - अध्यक्ष, संबंधित गटविकास अधिकारी व मंडळ अधिकारी - समितीचे सदस्य )

(ड) तयार करण्यात आलेले प्रारुप प्रभाग रचना व आरक्षण तपासणीसाठी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे तात्काळ सादर करण्यात यावे. या तपासणीत जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रभागांची संख्या सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येच्या प्रमाणात आहे किंवा कसे ? आरक्षण मागील निवडणुकांनुसार चक्रानुक्रमे पुढे क्रमश: घेण्यात आले आहे किंवा कसे ? प्रभागांची सीमा सर्वसाधारण नियमानुसार आहे किंवा कसे ? इत्यादी मूलभूत मुद्यांबाबत तपासणी करावी व आवश्यक असल्यास दुरुस्त्या करून असे प्रारुप तात्काळ संबंधित तहसिल कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित करावे.

(इ) जिल्हाधिकारी कार्यालयाकडील तपासणीनुसार तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीने आरक्षणासह वरील प्रारूप प्रभाग रचनेला मान्यता देणे व समितीच्या सर्व सदस्यांनी त्यावर स्वाक्षरी करणे.

(ई) विशेष ग्रामसभा बोलावून, प्रारुप प्रभागावर आरक्षणाची सोडत काढणे ( नागारीकांचा मागास प्रवर्ग व महिला - अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती नागारीकांच्या मागास प्रवर्गातील महिलांसह ). **या विशेष ग्रामसभेस गणपूर्तीची तसेच सोडतीच्या प्रस्तावास ग्रामपंचायतीच्या मान्यतेची आवश्यकता असणार नाही.** ( कार्यवाही - तहसिलदार यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली तलाठी व ग्रामसेवक यांनी )

**४.२ प्रारुप प्रभाग रचना व आरक्षण ( नमुना - ब ) वर हरकती व सूचना**

(अ) प्रारूप प्रभाग रचनेवर हरकती व सूचना मागविण्यासाठी जाहीर सूचना प्रसिध्द करणे. (कार्यवाही - तहसिलदार )

**(ब)** **नकाशावर प्रचलित पध्दतीने प्रभाग पाडणे (ग्रामपंचायतींच्या दक्षिण दिशेपासून सुरुवात करुन त्यानंतर दक्षिण-पश्चिम, पश्चिम, उत्तर-पश्चिम, उत्तर, उत्तर-पूर्व, पूर्व व दक्षिण-पूर्व या रितीने प्रभाग पाडावेत) व अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती यांचे आरक्षण निश्चित करणे :-**

i) तहसिलदार यांनी तयार केलेले नकाशे व सन-२०११ च्या जनगणनेची लोकसंख्या या आधारे प्रभागाची संख्या व अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती यांचे आरक्षण निश्चित करावे.

ii) संबंधित तलाठी आणि ग्रामसेवक यांनी स्थळ पाहणी करून गुगल मॅपमधील **फक्त निवासी वापराच्या** वास्तु चिन्हांकित कराव्यात व त्यानंतर सन-२०११ च्या जनगणनेतील लोकसंख्येच्या प्रमाणात निवासी वास्तूंचे गुणोत्तर काढून प्रती घर सरासरी व्यक्ती निश्चित करण्यात याव्यात. यानंतर प्रचलित पध्दतीने दक्षिण दिशेपासून सुरूवात करून विहित रितीने प्रभाग पाडून व त्यांना क्रमांक देऊन प्रभागांच्या सीमा निश्चित कराव्यात.

iii) **प्रभागांची सरासरी लोकसंख्या:-** आयोगाचे क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२००५/ प्र.क्र.२३/का-८, दि.३०/०८/२००५ च्या पत्रानुसार प्रभाग रचना करताना ग्रामपंचायतींच्या लगतच्या जनगणनेनुसार म्हणजे सन-२०११ च्या जनगणनेनुसारची एकूण लोकसंख्या भागिले ग्रामपंचायतींची एकूण सदस्य संख्या या सूत्रानुसार प्रभागाची सरासरी लोकसंख्या निश्चित करावी. प्रभागाची लोकसंख्या त्या ग्रामपंचायतीच्या प्रभागाच्या सरासरी लोकसंख्येच्या १०% कमी किंवा १०% जास्त या मर्यादेत ठेवता येईल. एखाद्या अपवादात्मक परिस्थितीत प्रभागाची लोकसंख्या या किमान किंवा कमाल मर्यादेपेक्षा कमी किंवा जास्त असल्यास त्याचे कारण प्रभाग रचनेच्या प्रस्तावात नमूद करणे आवश्यक राहील.

iv) मुंबई ग्रामपंचायत (गावाचे प्रभागात विभाजन करणे आणि स्त्रियां, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी जागा राखून ठेवणे) नियम, १९६६ मधील नियम ३ मधील तरतुदीनुसार प्रभाग रचना सुरु करताना सर्वप्रथम दक्षिण दिशेकडून सुरुवात करावी. त्यानंतर दक्षिण-पश्चिम, पश्चिम, उत्तर-पश्चिम, उत्तर, उत्तर-पूर्व, पूर्व व दक्षिण-पूर्ण या क्रमाने प्रभागांना क्रमांक देण्यात यावेत. तसेच एकाच दिशेस एकाहून अधिक प्रभाग पडत असतील तर त्या दिशेस गावाच्या सीमेजवळ असलेल्या प्रभागास पहिला क्रमांक देऊन त्याच्या लगतच्या प्रभागास दुसरा व पुढे असे क्रमांक देण्यात यावेत. प्रभाग रचना करताना भौगोलिक सलगता राहील, याची काळजी घ्यावी.

v) प्रभाग रचना करताना लोकसंख्या व प्रभागाची भौगोलिकदृष्टया आटोपशीर व्याप्ती या दोन मुख्य गोष्टी असल्या तरी नागरिकांच्या सामायिक हिताकरिता पुढील बाबी विचारात घ्याव्यात :-

अ) प्रभागातील वस्त्यांचे शक्यतोवर विभाजन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

(ब) प्राप्त झालेल्या प्रत्येक हरकती व सूचना सुनावणीसाठी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे विनाविलंब सादर करणे.( कार्यवाही - तहसिलदार )

(क) तहसिल कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या प्रत्येक हरकती व सूचनांवर तातडीने सुनावणी घेऊन स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अंतिम निर्णयासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करणे. ( कार्यवाही - उपविभागीय अधिकारी )

**४.३ प्रभाग रचना अंतिम करणे.**

(अ) **प्रभाग रचना व आरक्षणाबाबत प्राप्त प्रत्येक हरकतींसंदर्भात अंतिम आदेश जिल्हाधिकारी यांच्याच स्वाक्षरीने पारित करणे आवश्यक आहे व असे आदेश संबंधित हरकतदारास बजावणे. तसेच प्रभाग रचना व आरक्षणास अंतिम मान्यता देणे.**

( कार्यवाही - जिल्हाधिकारी )

(ब) अंतिम प्रभाग रचना व आरक्षणाला (नमुना-अ) व्यापक प्रसिध्दी देणे (कार्यवाही - तहसिलदार)

**५. वरील टप्पे पार पाडताना जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-**

**५.१ प्रारुप प्रभाग रचना तयार करणे :-**

अ) गुगल मॅपवर MRSAC **यांनी तयार केलेले नकाशे** Super Impose करून गावाचे नकाशे अंतिम करणे :

i) प्रत्येक तहसिलदार यांनी गुगल मॅप किंवा तत्सम नकाशे त्वरीत डाऊनलोड करावेत.

ii) जिल्हाधिकारी यांनी ग्रामपंचायतींचे विसर्जन झाल्याने नव्याने स्थापित झालेल्या ग्रामपंचायतींची अद्ययावत यादी तयार करावी व प्रत्येक ग्रामपंचायतींत समाविष्ट असलेल्या गावांना **सन-२०११ च्या जनगणनेनुसार** Census Code **देऊन ही यादी त्वरीत** MRSAC **च्या कार्यालयास त्यांनी दिलेल्या विहीत नमुन्यात पाठवून त्यांनी तयार केलेले नकाशे प्राप्त करून घ्यावेत.**

**iii) तसेच प्रारुप प्रभाग रचनेची कार्यवाही MRSAC च्या नकाशानुसार पूर्ण होताच त्याबाबतचा अहवाल (नकाशाच्या KML फाईलसह) संचालक MRSAC यांना ई-मेलद्वारे न चुकता अग्रेषित करण्यात यावा.**

iv) तहसिलदार यांनी गुगल मॅपवर MRSAC **चे** नकाशे Super Impose करून प्रत्येक गावाचे नकाशे अंतिम करावेत व त्यात नैसर्गिक हद्दी उदा. रस्ते, नदी, नाले, इत्यादी सुस्पष्टपणे दर्शविण्यात यावेत.

असे करताना ग्रामपंचायतींच्या कोणत्याही क्षेत्रातील वस्ती, पाडे/ वाड्या सुटणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.

आ) अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती यांच्या वस्त्यांचे शक्यतोवर विभाजन होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

इ) नागरिकांचे प्रभागामधील दळणवळण शक्यतो विचारात घ्यावे.

vi) प्रभागाच्या सीमारेषा, मोठे रस्ते, गल्ल्या, नद्या, नाले, डोंगर, रस्ते, फ्लायओव्हर इत्यादी नैसर्गिक मर्यादा विचारात घेऊन निश्चित कराव्यात. कोणत्याही परिस्थितीत एका इमारतीचे, चाळीचे, घराचे विभाजन दोन प्रभागांमध्ये होणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे मोकळ्या जागांसह सर्व जागा कोणत्या ना कोणत्या प्रभागात आल्याच पाहिजेत. प्रभाग रचनेच्या बाबतीत कोणासही शंका घेण्यास वाव राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. सीमेचे वर्णन करताना रस्ते, नाले, नद्या, सर्व्हे/गट क्रमांक इत्यादींचा उल्लेख प्रामुख्याने यावयास हवा.

vii) प्रत्येक प्रभागाच्या सीमारेषेचे वर्णन करताना दक्षिण, पश्चिम, उत्तर व पूर्व अशा दिशा नमूद करून सीमारेषेचे वर्णन करावे. सीमारेषा नमूद करताना गावातील सर्वसाधारण नागरिकांना प्रभागाची पूर्ण कल्पना येईल, याची काळजी घ्यावी.

viii) अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करण्यासाठी प्रभागांमधील जागांचे वाटप चक्राकार पध्दतीने मागील सार्वत्रिक निवडणुकीतील आरक्षणाच्या अनुषंगाने क्रमशः पुढे करावयाचे आहे.

ix) **अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता एकच पद देय असल्यास:-** अनुसूचित जाती अथवा अनुसूचित जमातीकरिता एकच जागा अनुज्ञेय होत असल्यास ती जागा अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीच्या महिलांकरिता आरक्षित होईल किंवा कसे हे सोडतीने ठरविण्यात.यावे. मात्र मागील निवडणुकीत जर ती जागा यथास्थिती अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीच्या महिलांकरिता आरक्षित असेल तर ती जागा या निवडणुकीत त्या प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित होणार नाही.

**(क) प्रारूप प्रभाग रचनेला मान्यता देणे -**

i) वरीलप्रमाणे कार्यवाही करून अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या आरक्षणासह प्रारूप प्रभाग रचनेवर संबंधित तलाठी व ग्रामसेवक यांनी स्वाक्षरी करून ती मान्यतेसाठी तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीस सादर करावी. या प्रस्तावात खालील बाबी समाविष्ट असाव्यात.

(अ) गुगल अर्थ किंवा तत्सम नकाशा, या नकाशावर प्रभागांच्या सीमा ठळक रंगाने दर्शवाव्यात.

(ब) नकाशावर महत्वाची ठिकाणे, रस्ते, नद्या, नाले, रेल्वे लाईन इत्यादी स्पष्टपणे दर्शवावे.

(क) नव्याने निर्माण झालेल्या ग्रामपंचायतींच्या प्रभागांच्या सीमा वेगळ्या रंगाने दर्शविण्यात याव्यात.

ii) या प्रारूप प्रभाग रचनेस तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीने तपासणीअंती मान्यता द्यावी व ते प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मान्यतेसाठी पाठवावेत. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मान्यतेनंतर आवश्यक त्या सुधारणा करुन अंतिम प्रारुप प्रभागरचनेचे प्रस्तावावर स्वाक्षरी करावी. सदर समितीचे संबंधित गटविकास अधिकारी व मंडळ अधिकारी हे सदस्य असतील.

**(ड) विशेष ग्रामसभेची सूचना देवून, ग्रामसभा बोलाविणे व प्रारुप प्रभागनिहाय आरक्षणाची सोडत काढणे - (नागरिकांचा मागास प्रवर्ग व महिला - अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागास प्रवर्गातील महिलांसह)**

i) जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर तहसिलदार यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली तलाठी व ग्रामसेवक यांनी विशेष ग्रामसभा बोलावून त्यात सोडत पध्दतीने (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व महिलांसह) राखीव जागांचे आरक्षण निश्चित करावे.

ii) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसह) याकरिता महाराष्ट्र ग्रामपंचायत (सदस्यांची संख्या, प्रभागात विभाजन करणे व जागा राखून ठेवणे) नियम, १९६६ मधील नियम ४, ४-अ, ४-अअ व ४-ब च्या तरतुदीनुसार तसेच आयोगाच्या दि.३०/०८/२००५ रोजीच्या आदेशानुसार कार्यवाही करावी. तसेच आयोगाच्या दि.२१/०४/१९९८ च्या परिपत्रकात नमूद केल्यानुसार **"पुरूष राखीव" जागा दर्शविणे हे असंविधानिक तसेच बेकायदेशीर आहे,** ही बाब सर्व संबंधिताच्या निदर्शनास आणण्यात यावी.

iii) सोडतीचे स्थळ, वेळ व दिनांक यांना मोठ्या प्रमाणावर प्रसिध्दी द्यावी. (ग्रामपंचायत /तलाठी/मंडळ अधिकारी/तहसिल / पंचायत समिती कार्यालयांचे नोटीस बोर्डावर).

**(इ) प्रारूप प्रभाग रचना व आरक्षणास व्यापक प्रसिध्दी देणे:**

वरील प्रारूप प्रभाग रचना व आरक्षणास तहसिलदार यांनी [मुंबई ग्रामपंचायत (गावाचे प्रभागात विभाजन करणे आणि स्त्रिया, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी जागा राखून ठेवणे)नियम, १९६६ मधील नियम ५(२) नमुना - ब मध्ये] व्यापक प्रसिध्दी द्यावी.

( ग्रामपंचायत / तलाठी / मंडळ अधिकारी / तहसिल / पंचायत समिती कार्यालयांचे नोटीस बोर्डावर )

**५.२ प्रारूप प्रभाग रचना व आरक्षणावर हरकती व सूचना:**

**(अ)** प्रारूप प्रभाग रचनेवर हरकती व सूचना मागविण्यासाठी जाहीर सूचना प्रसिध्द करणे-

i) विशेष ग्रामसभेत आरक्षणाच्या सोडतीअंती प्रभाग रचना निश्चित झाल्यावर याबाबतची नमुना-ब मध्ये प्रसिध्दी व्यापक स्तरावर करण्यात येऊन या दिनांकापासून सोबतच्या परिशिष्टात दर्शविलेल्या कालमर्यादेत संबंधित ग्रामस्थांच्या हरकती व सूचना लेखी स्वरूपात तहसिल कार्यालयात मागविण्यात याव्यात.

ii) सदर हरकती व सूचना स्वीकारण्यासाठी तहसिलदार **यांनी विशेष कक्ष स्थापन करावा** व प्राप्त होणाऱ्या प्रत्येक हरकती व सूचनांची नोंद स्वतंत्र नोंदवहीत घेवून अर्जदारास हरकत प्राप्त झाल्याची पोच पावती द्यावी.

**(ब) प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी घेणे**

i) तहसिलदार यांनी प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचना तातडीने संबंधित उपविभागीय अधिकारी यांना सादर कराव्यात.

ii) उपविभागीय अधिकारी यांनी प्राप्त हरकतींवर प्रत्यक्ष अर्जदाराच्या उपस्थितीत सुनावणी घ्यावी यावेळी त्यांनी आवश्यक असल्यास नायब तहसिलदार या दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याकडून स्थळ पाहणी अहवाल घ्यावा.

iii) या अनुषंगाने प्रभाग रचना व आरक्षणात आवश्यक ते बदल (विवरणपत्रे, नकाशे व अधिसूचना इ.मध्ये) तहसिलदार यांच्या स्तरावर करून उपविभागीय अधिकारी यांना सदर प्रस्ताव फेरसादर करावा.

iv) सुनावणीनंतर उपविभागीय अधिकारी यांनी तहसिलदार, गटविकास अधिकारी यांच्यासह प्रभाग रचना व आरक्षणाचा अंतिम मसुदा तयार करावा व सर्व संबंधितांच्या स्वाक्षरी व्र अभिप्रायासह सदर मसुदा मान्यतेसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करावा.

**५.३ प्रभाग रचना व आरक्षणाची कार्यवाही अंतिम करणे.**

**अ)** प्रभाग रचना व आरक्षण यांना अंतिम मान्यता देणे:

i) जिल्हाधिकारी यांनी प्रभाग रचना व आरक्षणाच्या प्राप्त मुसद्यातील सर्व बाबींची एकवार तपासणी करून प्राप्त हरकतींवरील उपविभागीय अधिकारी यांनी सुनावणीअंती दिलेल्या अभिप्रायांचा विचार करून प्रत्येक हरकतदारास त्याची हरकत मान्य, अंशत: मान्य अथवा अमान्य या प्रकारचा स्पष्ट शेरा सकारण नमूद करून जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीने अंतिम आदेश संबंधितास बजावण्यात यावा.

तसेच प्रभाग रचना व आरक्षणाबाबत उपविभागीय अधिकारी यांच्याकडून सादर करण्यात आलेला प्रस्ताव नियमानुसार असल्याबाबत खातरजमा करावी व त्यानंतर प्रभाग रचना व आरक्षणाला मान्यता देवून ते अंतिम करावेत.

ii) त्यानंतर अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना [मुंबई ग्रामपंचायत (गावाचे प्रभागात विभाजन करणे आणि स्त्रिया, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाजीसाठी जागा राखून ठेवणे) नियम, १९६६ मधील नियम ५ (१) नमुना-अ नुसार] संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून, प्रसिध्द करण्यात येईल.

**ब)** अंतिम प्रभाग रचना व आरक्षण (नमुना अ) यास व्यापक प्रसिध्दी देणे :-

या अंतिम अधिसूचनेला व्यापक प्रसिध्दी द्यावी. ( तलाठी/ग्रामपंचायत / तहसिल व पंचायत समिती कार्यालय/ जिल्हा व तहसिल पातळीवरील कार्यालयांचे नोटीस बोर्ड व वेबसाईटवर )

६. प्रभाग रचनेच्या अंतिमत: प्रसिध्द करण्यात येणाऱ्या नकाशा व नमुना - अ वर संबंधित संबंधित गट विकास अधिकारी, तहसिलदार, उपविभागीय अधिकारी तसेच जिल्हाधिकारी या सर्वांची स्वाक्षरी असणे अनिवार्य आहे.

७. वरील कार्यक्रमाची अंमलबजावणी ही महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ व मुंबई ग्रामपंचायत (गावाचे प्रभागात विभाजन करणे आणि स्त्रिया, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी जागा राखून ठेवणे) नियम १९६६ च्या तरतुदीनुसार तसेच आयोगाने दिनांक २१/११/२००७, दिनांक १३/०५/२०११ व वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार करण्यात यावी.

८. अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द झाल्यानंतर जिल्हानिहाय ग्रामपंचायतींचा आरक्षणाचा तपशील दर्शविणारा नमुना - १ राज्य निवडणूक आयोगास ई-मेलव्दारे पुढील ३ दिवसात सादर करण्याची दक्षता घ्यावी.

९. सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील ग्रामपंचायतींकरीता तसेच विभाजन/एकत्रीकरण झालेल्या इतर ग्रामपंचायती असलयास त्यांच्याकरीता देखील परिशिष्ट १ नुसार प्रभागरचना व आरक्षणाचा कार्यक्रम देण्यात येत आहे. त्यानुसार कार्यक्र राबविण्याची संबंधित जिल्हाधिकारी यांनी दक्षता घ्यावी व केलेल्या कार्यवाहीबाबत राज्य निवडणूक आयोगास तात्काळ अवगत करावे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(अतुल जाधव)
प्र. अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**सहपत्र - परिशिष्ट १ व विवरणपत्र**

**प्रती - १.** प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन.

i) उक्त कालावधीतील ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसंदर्भात अनुदानाची पर्याप्त तरतूद (मागील अनुदानाच्या थकबाकीसह) करण्याबाबत आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच या पत्रात निर्देश दिल्यानुसार प्रभाग रचना व आरक्षणाच्या कार्यक्रमात ग्रामसेवकासह संबंधित गटविकास अधिकारी व

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं.) जिल्हा परिषद यांची सक्रिय भूमिका व जबाबदारी राहील, तसेच प्रारूप प्रभाग रचना गुगल मॅप व MRSAC नकाशांच्या सहाय्याने संयुक्त सर्वेक्षणाअंती तयार करण्यासंबंधात आवश्यक ते सर्व सहकार्य संबंधित तहसिलदार यांना उपलब्ध करून देतील, याबाबतचे निर्देश देणारे पत्र आपणाकडून तातडीने निर्गमित करण्यात यावे.

ii) सोबतच्या विवरणपत्रातनमूद ग्रामपंचायतींव्यतिरिक्त काही अन्य ग्रामपंचायतींचे दरम्यानच्या काळात विभाजन/एकत्रीकरण झाले असल्यास त्याची माहिती कृपया तात्काळ राज्य निवडणूक आयोगास द्यावी, जेणेकरुन विहित मुदतीत त्या ग्रामपंचायतींच्या निवडणूका घेणे शक्य होईल.

२.सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांना माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी.

३.विभागीय आयुक्त (सर्व),

**४.जिल्हाधिकारी सर्व (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)**

**५.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व)**

**नव्याने स्थापित ग्रामपंचायतींचा तपशिल दिनांक २१/१०/२०१९ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयास उपलब्ध करून देण्यात यावा. तसेच परिच्छेद ५.१ (ब) व (ड) मध्ये नमूद केल्यानुसार ग्रामसेवकांना संयुक्त सर्वेक्षणासाठी निर्देश देण्यात यावे तसेच विशेष ग्रामसभेचे आयोजन विहीत वेळापत्रकानुसार करण्याची दक्षता घ्यावी.**

**६.संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र (MRSAC), नागपूर यांना**

**आपणास विनंती करण्यात येते कि, जिल्ह्यांना त्यांच्या मागणीनुसार संबंधित गावांचे उपग्रह नकाशे तत्परतेने उपलब्ध करून देण्यात यावे.**

७.माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

८.सर्व निवडणूक कार्यासने

९.निवड नस्ती.

परिशिष्ट १

*आयोगाचे क्रमांक - रानिआ/प्रापंनि २०१९/प्र.क्र.११/का.०८, दिनांक ०९/१०/२०१९ रोजीच्या पत्रासोबतचे सहपत्र*

**नव्याने स्थापित झालेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रम.**

| अ. क्र. | प्रभाग रचना व आरक्षणाचा टप्पा | कार्यवाही पूर्ण करण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|
| | प्रारुप प्रभाग रचना तयार करणे (परिच्छेद ५.१) | |
| १ | i) तहसिलदार यांनी गुगलमॅप वर MRSAC चे नकाशे super impose करुन प्रत्येक गावाचे नकाशे अंतिम करणे(परिच्छेद ५.१ (अ)) | दिनांक ०१/११/२०१९ (शुक्रवार) |
| | ii) संबंधित तलाठी व ग्रामसेवक यांनी संयुक्त स्थळपाहणी करुन प्रभाग पाडणे, सीमा निश्चित करणे व अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे आरक्षण निश्चित करणे(परिच्छेद ५.१ (ब)) | दिनांक०५/११/२०१९ (मंगळवार) |
| | iii) तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीने प्रारुप प्रभागरचनेला मान्यता देणे व सर्व सदस्यांनी स्वाक्षरी करणे | दिनांक ०८/११/२०१९ (शुक्रवार) |
| | iv) जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नमुना-ब(प्रारुप प्रभाग रचना व आरक्षण)प्रसिध्द करण्यापूर्वी तहसिल कार्यालयाकडून असे प्रस्ताव प्राप्त करुन त्याची संक्षिप्त प्राथमिक तपासणी करणे व त्यात आवश्यक असल्यास दुरुस्त्या करणे. | दिनांक १३/११/२०१९ (बुधवार) |
| | v) या दुरुस्त्या अंतर्भूत करुन प्रारुप प्रभाग रचना व आरक्षणाला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागास प्रवर्गातील महिलांसह) तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीने मान्यता द्यावी व समितीच्या सर्व सदस्यांनी स्वाक्षरी करावी. | दिनांक १५/११/२०१९ (शुक्रवार) |
| | vi) विशेष ग्रामसभेची सूचना देणे ( आरक्षणाची सोडत काढण्याकरीता ) | दिनांक १६/११/२०१९ (शनिवार) |
| | vii) विशेष ग्रामसभा बोलवून, तहसिलदार यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली, प्रारुप प्रभाग रचनेवर आरक्षणाची सोडत (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागास प्रवर्गातील महिलांसह) काढणे | दिनांक १८/११/२०१९ (सोमवार) |
| | प्रारुप प्रभाग रचनेवर हरकती व सूचना मागविणे (परिच्छेद ५.२) | |
| २ | viii) प्रारुप प्रभाग रचनेला ( नमुना ब) व्यापक प्रसिध्दी देऊन तहसिलदार यांनी हरकती व सूचना मागविण्यासाठी जाहिर सूचना प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक १९/११/२०१९ (मंगळवार) |
| | ix) प्रारुप प्रभाग रचनेवर हरकती सादर करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक २६/११/२०१९ (मंगळवार) |
| | x) प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचना सुनावणीसाठी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सादर करणे | दिनांक २७/११/२०१९ (बुधवार) |
| | xi) प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचनांवर उपविभागीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे | दिनांक ३०/११/२०१९ (शनिवार) |
| | xii) आलेल्या प्रत्येक हरकती व सुचनांवर सुनावणीनंतर अभिप्रायासह अंतिम निर्णयासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करणे | दिनांक ३०/११/२०१९ (शनिवार) |
| | प्रभाग रचना अंतिम करणे (परिच्छेद ५.३) | |
| ३ | xii) उपविभागीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले प्रस्ताव तपासून जिल्हाधिकारी यांनी प्रभाग रचना व आरक्षणाला अंतिम मान्यता देणे व स्वाक्षरी करणे | दिनांक ०२/१२/२०१९ (सोमवार) |
| | xiv) जिल्हाधिकारी यांनी मान्य केलेल्या अंतिम प्रभाग रचनेला (नमुना अ मध्ये) व्यापक प्रसिध्दी देणे | दिनांक ०३/१२/२०१९ (मंगळवार) |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(अतुल जाधव)
प्र.अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

( राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/ग्रापंनि २०१९/प्र.क्र.११/का.०८, दिनांक ०९/१०/२०१९ सोबतचे सहपत्र)

विवरणपत्र

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | मूळ ग्रामपंचायत | विभाजनानंतर स्वंतत्र ग्रामपंचायत |
|---|---|---|---|---|
| १ | अहमदनगर | संगमनेर | नान्नज दुमाला | नान्नज दुमाला<br>काकडवाडी |
| २ | नाशिक | मालेगाव | वडनेर | वडनेर<br>सावतावाडी |
| ३ | ठाणे | भिवंडी | सावद | सावद<br>किरवली तर्फे सोनाळे |
| ४ | जळगाव | चाळीसगाव | करगाव | करगाव<br>चैतन्य तांडा क्र.४<br>इच्छापूर तांडा क्र.२ |
| ५ | जळगाव | अमळनेर | रणाईचे बु. | रणाईचे बु.<br>रणाईचे खुर्द. |
| ६ | अहमदनगर | श्रीगोंदा | मांडवगण | मांडवगण<br>महांडुळवाडी |
| ७ | यवतमाळ | दिग्रस | सावंगा खुर्द | सावंगा खुर्द<br>फुलवाडी |
| ८ | अहमदनगर | पारनेर | राळेगण थेरपाळ | राळेगण थेरपाळ<br>म्हसे खुर्द |
| ९ | नाशिक | दिंडोरी | ननाशी | ननाशी<br>सावरपाडा |
| १० | नागपूर | नागपूर | खापरी (रेल्वे) व कलकुही | खापरी (रेल्वे) (कलकुही) |
| ११ | जळगाव | धरणगाव | एकलग्न बु. | एकलग्न बु.<br>पोखरी |
| १२ | यवतमाळ | पुसद | शेलु बु. | शेलु बु.<br>कृष्णनगर |
| १३ | अहमदनगर | श्रीगोंदा | कोकणगाव | कोकणगाव<br>भावडी |
| १४ | औरंगाबाद | गंगापूर | घाणेगाव | घाणेगाव<br>ईटावा |